Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – II August 2015

# नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांचे आर्थिक आणि सामाजिक अध्ययन (सन १९९८ ते २०११)

मार्गदर्शक
प्रा. डॉ. एस. के. पगार,
के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक.

श्री. राजेश एस. गावित,
पीएच.डी. संशोधक विद्यार्थी,
सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ, पुणे.

## प्रस्तावना

१ एप्रिल १९९८ रोजी धुळे जिल्हयाला विभागून नवीन नंदुरबार जिल्हयांची स्थापना करण्यात आली. १९९१ च्या जनगणनेनुसार धुळे जिल्हयांची आदिवासी लोकसंख्या महाराष्ट्रात सर्वात जास्त होती. १९९१ च्या जनगणेनुसार अनुसूचित जमातीची लोकसंख्या ६२.२५ टक्के होती. याच कालखंडात नंदुरबार जिल्हयांची एकूण गावाची संख्या ९३४ एवढी होती. (१९९१ च्या जनगणनेनुसार) आणि एकूण आदिवासी क्षेत्र शेकडा प्रमाण ८७ टक्के एवढे होते.

नंदुरबार जिल्हा महाराष्ट्रातील मागासलेल्या जिल्हयापैकी एक जिल्हा आहे. या जिल्हयात आदिवासी शेतकऱ्यांचे एकंदरीत शेती कसण्याची पध्दती मागासलेली आहे. जिल्हयात आजही मोठया प्रमाणात अंधश्रध्देमुळे या शेतकऱ्यांचे जीवन, आर्थिक, सामाजिक दृष्टीकोनातून मागासलेले आहे. जिल्हयांतील या आदिवासी शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी किंवा विकासासाठी चिकित्सक अभ्यास करणे गरजेचे वाटले व संशोधकाला हा केलेला अभ्यास आदिवासी विकास कार्यात मार्गदर्शक ठरेल असा विश्वास वाटतो.

## संशोधन विषयाचे महत्त्व

१) जिल्हयातील एकूण आदिवासी क्षेत्राचे सरासरी प्रमाण ८७ टक्के आहे. या जिल्हयातील बहुसंख्य लोकसंख्या शेती कसते व ही शेती आजही मोठया प्रमाणात परंपरागत पध्दतीने कसत असल्यामुळे आजच्या विज्ञान युगात आदिवासी शेतकरी मागे राहू नये यासाठी आधुनिक पध्दतीने शेती केल्यास त्यांच्या उत्पादन क्षमतेत वाढ होण्यास मदत होईल त्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे आहे.

२) आदिवासी शेतकऱ्यांची शेती मागासलेली असल्यामुळे त्याचे उत्पन्न कमी असल्याने त्यांची बचत क्षमता देखील कमी आहे. परिणामी त्यांची शेतीतील गुंतवणूक कमी होते. आदिवासी शेतकऱ्यांची उत्पन्न व बचत क्षमता वाढवायची असेल तर आदिवासी विकास योजनांचा लाभ घेणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने हे

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – II August 2015

संशोधन महत्त्वाचे आहे.

३) आदिवासी शेतकऱ्यांमध्ये दारिद्रयांचे प्रमाण जास्त आहे. तसेच शिक्षणाचा अभाव असल्यामुळे अंधश्रध्देचे प्रमाण जास्त आहे. या संशोधनाच्या माध्यमातून आदिवासी शेतकऱ्यांमध्ये असणारी अंधश्रध्दा, व्यासनाधिनतेचे मोठे प्रमाण, अनिष्ठ रूढी, परंपरा, प्रथा कमी होण्यास व शिक्षणाचा प्रसार वाढल्यास त्यांच्यात जागृती होवून त्यांच्या राहणीमानात सुधारणा होईल या दृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे आहे.

४) जिल्हयांतील आदिवासी समाज अज्ञानी, अडाणी, देवभोळा असून रूढी, परंपरा, चालिरिती इ. बंधनात अडकलेला आहे. त्यांचा अभ्यास करून व या समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे.

५) आदिवासी समाजाकडे इतर समाजाचा बघण्याचा जो नकारात्मक दृष्टिकान आहे तो बदलण्यास काही प्रमाणात हे संशोधन महत्त्वाचे आहे.

६) जिल्हयातील साधारणत:हा निम्मे शेतकरी निरक्षर आहेत. त्यामुळे त्यांच्या निरक्षरतेचा प्रभाव शेतीवर, राहणीमानावर पडतो. त्यामुळे शिक्षणाला महत्त्व आहे. म्हणून शिक्षणाचा प्रसार, प्रचार होणे गरजेचे आहे त्यादृष्टिनेही हे संशोधन महत्त्वाचे आहे.

७) आदिवासी शेतकऱ्यासाठी शासनाने अनेक योजना राबविल्या आहेत. त्यातील बोटावर मोजण्याइतक्याच शेतकऱ्यांना या योजनाचा लाभ होतो. म्हणून जे शेतकरी अत्यंत गरीब आहे. मागासलेले आहे त्यांना राबवित असलेल्या योजनाचा लाभ होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यादृष्टिनेही हे संशोधन महत्त्वाचे आहे.

**संशोधन विषयाची उद्दिष्टे**

१) आदिवासी शेतकऱ्यांच्या शेती कसण्याच्या पध्दती व पीक रचनेचा अभ्यास करणे.

२) आदिवासी शेतकऱ्यांच्या विविध आर्थिक स्त्रोतांचा अभ्यास करणे.

३) शासनाने आदिवासी शेतकऱ्यांसाठी राबविलेल्या विविध योजनाचा अभ्यास करणे.

४) आदिवासी शेतकऱ्यांच्या राहणीमानाचा अभ्यास करणे.

५) आदिवासी शेतकऱ्यांच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास करणे.

**गृहित कल्पना.**

१) आदिवासी शेतकऱ्यांची शेती कसण्याची पध्दती आणि उत्पन्न यात सहसंबंध आहे.

२) आदिवासी शेतकरी कुटुंबाची आर्थिक स्थिती कुमकुवत आहे.

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – II August 2015

३) आदिवासी शेतकऱ्यांचे उत्पन्नाचे मार्ग (स्त्रोत) व राहणीमान यात सहसंबंध आहे.

४) आदिवासी शेतकऱ्यांचा सामाजिक दर्जा व आर्थिक परिस्थिती यात सहसंबंध आहे.

**संशोधनाची व्याप्ती**

**व्याप्ती**

संशोधकाने निवडलेल्या विषयाची व्याप्ती नंदुरबार जिल्हयापुरतीच मर्यादित असून जिल्हयातील निवडलेल्या ९४ गावापुरतीच मर्यादित आहे. जिल्हयांतील कार्यक्षेत्राच्या दृष्टीने विचार केल्यास जिल्हयाचा विस्तार व्यापक आहे व या जिल्हयात एकूण ९३४ गावे आहेत. या व्यापक कार्यक्षेत्राचा विचार केल्यास जिल्हयांतील ९३४ गावापैकी ९४ गावे अध्ययनासाठी वापर केला आहे. या ९४ गावातील अल्प – १८८, मध्यम – २८२ व मोठे – ९४ असे एकूण ५६४ शेतकरी कुटुंबाकडून प्रश्नावली भरून घेतल्या आहेत.

**नमुना निवड**

नंदुरबार जिल्हयातील सर्व तालुक्यातील निवड केली असून प्रत्येक तालुक्यातील एकूण गावाच्या १० टक्के प्रमाणे नमुना निवड केली आहे. या प्रत्येक गावातून सहा शेतकऱ्यांची नमुना म्हणून निवड केली आहे.

**नमुना निवडीचा आकृतीबंध**

| तालुका | एकूण गावे | १० टक्के प्रमाणे गावे | प्रत्येक गावातील सहा शेतकऱ्यांची निवड | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | एकूण | अल्प | मध्यम | मोठे |
| नंदुरबार | १५३ | १५ | ९० | ३० | ४५ | १५ |
| नवापूर | १५५ | १६ | ९६ | ३२ | ४८ | १६ |
| तळोदा | ९२ | ०९ | ५४ | १८ | २७ | ०९ |
| अक्कलकुवा | १८६ | १९ | ११४ | ३८ | ५७ | १९ |
| धडगाव | १६३ | १६ | ९६ | ३२ | ४८ | १६ |
| शहादा | १८४ | १९ | ११४ | ३८ | ५७ | १९ |
| **एकूण** | **९३४** | **९४** | **५६४** | **१८८** | **२८२** | **९४** |

**संदर्भ – भारतीय जनगणना अहवाल २००१**

**संशोधनाची मर्यादा**

१) प्रस्तुत अभ्यास नंदुरबार जिल्हयापुरता व निवडलेल्या गावापुरताच मर्यादित आहे.

२) अभ्यासकाने गोळा केलेली माहिती प्रत्यक्ष व दुय्यम संकलन पध्दतीवर आधारलेली असल्यामुळे ती १००

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – II August 2015

टक्के खरी असेलच असे नाही.

३) अभ्यासकाने संपूर्ण जिल्हयातील माहिती संकलनासाठी प्रश्नावली व संदर्भ साहित्याचा अभ्यास करून सदर विषयाचे विश्लेषण केले आहे.

४) आदिवासी शेतकऱ्यांच्या विकासासाठी असलेली शासकीय योजनाची माहिती पूर्ण मिळेलच असे नाही.

५) संशोधकाने अभ्यासाचा कालावधी १९९८ ते २०११ या कालावधीपुरता मर्यादित आहे.

६) आदिवासी शेतकऱ्यांचा हा अभ्यास दुसऱ्या आदिवासी जिल्हयास तसाच लागू पडेल असे नाही.

तरी देखील संशोधक शक्यतो पूर्वग्रह दोषरहित तथ्य संकलन करून विश्लेषण केलेले आहे.

**संशोधनाचे निष्कर्ष**

**आर्थिक निष्कर्ष**

१) नंदुरबार जिल्ह्यातील नमुना निवडीतील शेतकरी कुटुंबाची सर्व मार्गाने मिळणाऱ्या उत्पन्नाच्या वर्गीकरणात २५००० पेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या शेतकरी कुटुंबाचे प्रमाण ११.७ टक्के, २५ ते ५० हजार पर्यंत उत्पन्न मिळविणाऱ्यांचे प्रमाण १९ टक्के, ५० ते ७५ हजार पर्यंत उत्पन्न मिळविणाऱ्यांचे प्रमाण २६.६ टक्के, १ ते २ लाख उत्पन्न मिळविणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण १३.६ टक्के, व २ लाखापेक्षा जास्त उत्पन्न मिळविणाऱ्या शेतकरी कुटुंबाचे प्रमाण २.५ टक्के आहे.

२) नंदुरबार जिल्ह्यातील नमुना निवडीतील एकूण शेतकरी कुटुंबापैकी अल्प भूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण ३३.४ टक्के आहे. मध्यम भूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण ५० टक्के आहे तर मोठया भूधारकाची संख्या/प्रमाण १६.६ टक्के आहे.

३) नंदुरबार जिल्ह्यातील नमुना निवडीतील एकूण शेतकरी कुटुंबापैकी बागायत असणाऱ्या शेतकरी कुटुंबाचे शेकडा प्रमाण २४ टक्के आहे. कोरडवाहू किंवा जिरायती असणाऱ्या शेतकरी कुटुंबाचे प्रमाण ७६ टक्के आहे.

४) नमुना निवडीतील शेतकरी कुटुंबापैकी बागायती शेती करणारे कुटुंबे कोणत्या साधनांपासून शेती करतात त्यांचे प्रमाण स्पष्ट केले आहे. विहिर या साधनापासून शेती करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ७.४ टक्के आहे. कुपनलिका पासून शेती करणाऱ्यांचे प्रमाण ३.२ टक्के आहे. उपसासिंचनापासून शेती करणाऱ्यांचे प्रमाण ६.६ टक्के आहे. तर कालवा किंवा नदीपासून शेती करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ७.१ टक्के आहे.

५) नंदुरबार जिल्ह्यातील नमुना निवडीतील शेतकरी कुटुंबानी सन २००८ ते २०१३ पर्यंत घेतलेल्या प्राधान्य क्रमानुसार पिकाचे उत्पादन जिल्ह्यात भात शेतीचे प्रमाण सर्वात जास्त आहे त्याचे प्रमाण ८८.१ टक्के

आहे, तर उतरत्या क्रमाने ज्वारीचे प्रमाण २८.२ टक्के, सोयाबीनचे प्रमाण ५१.८ टक्के, इतर पिके ४९.७ टक्के, कापूसचे ३८.९ टक्के, तुर ३६.३ टक्के, भुईमुगचे प्रमाण २८.२ टक्के, ऊसाचे प्रमाण २२.३ टक्के एवढे आहे.

६) पिक रचनेत झालेल्या बदलाचे वर्गीकरणात नंदुरबार जिल्ह्यात नमुना निवडीतील शेतकरी बदल करीत आहे. त्यांचे प्रमाण ८६.२ टक्के आहे तर पारंपारिक पध्दतीनेच शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण १०.५ टक्के आहे. तर कोणतेच उत्तर न मिळणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ३.४ टक्के आहे.

७) नंदुरबार जिल्ह्यातील नमुना निवडीतील शेतकरी पीक कसण्याच्या पध्दतीत बदल करीत आहे. एकूण नमुना निवडीतील शेतकऱ्यांपैकी ८३.५ टक्के शेतकरी पीक कसण्याच्या पध्दतीत बदल करीत आहे.

८) नंदुरबार जिल्ह्यात गेल्या दहा वर्षाच्या काळात सोयाबीन हे पीक शेतकऱ्यांना माहित नव्हते. पण या दहा वर्षाच्या काळात सोयाबीन या नकदी पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण वाढत आहे.

९) नंदुरबार जिल्ह्यात आदिवासी शेतकरी आपल्या आहारात भात व ज्वारी यांचे प्रमाण जास्त घेतात किंवा त्याचा तो मुख्य आहार आहे म्हणून पुर्वीपासूनच भाताचे व ज्वारीचे उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. नंबर एकवर भात घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण  व नंबर दोनवर ज्वारी घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण आहे.

१०) नंदुरबार जिल्ह्यात पुर्वी पारंपारिक पिके घेत किंवा कुटुंबाला लागणाऱ्या अन्न धान्याचे उत्पादन करीत असे. पण सध्या आदिवासी शेतकऱ्यांच्याही दृष्टीकोनात बदल होत आहे. ते पारंपारिक पिकाबरोबर नकदी पिकाचे उत्पन्न घेवू लागले आहेत. त्यात कापूस, भुईमूग, ऊस व सोयाबीन या पिकाचे प्रमाण वाढत आहे.

११) नंदुरबार जिल्ह्यात कोरडवाहू किंवा जिरायती शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण आजही मोठया प्रमाणात आहे हे दिसून येते. त्यांचे शेकडा प्रमाण ७५.७ टक्के एवढे आहे.

१२) नंदुरबार जिल्ह्यात अनुसूचित जमातीच्या कुटुंबाच्या उत्पन्न निहाय साधने बघितल्यास कृषी शेती असणाऱ्या जमातीचे प्रमाण ४३.१ टक्के आहे तर कृषी मंजूर असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ३५.८ टक्के आहे व नोकरी करणाऱ्या या जमातीचे प्रमाण १३.५ टक्के आहे.

१३) नंदुरबार जिल्ह्यातील नमुना निवडीतील काही आदिवासी शेतकरी आपल्या शेतीबरोबर इतरांची शेती खंडाने घेवून कसणाऱ्यांचे प्रमाण २२.५ टक्के आहे तर काही शेतकऱ्याने आपली जमिन इतरांना खंडाने करावयास दिलेली आहे त्यांचे प्रमाण १९ टक्के आहे.

१४) नंदुरबार जिल्ह्यातील नमुना निवडीतील काही शेतकऱ्यांना शासनाने जमिनी दिलेल्या आहे अशा

शेतकऱ्यांचे प्रमाण ९.६ टक्के एवढे आहे.

१५) नमुना निवडीतील काही शेतकऱ्यांनी कर्ज बाजारीपणामुळे आपल्या जमिनी गहाण ठेवल्या आहे अशा शेतकऱ्यांचे प्रमाण ८.५ टक्के आहे.

१६) नंदुरबार जिल्ह्यातील नमुना निवडीतील आदिवासी शेतकऱ्यांनी कोणाकडून कर्ज घेतले आहे प्राप्त माहितीच्या वर्गीकरणावरून राष्ट्रीयकृत बॅंकाकडून कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ८.२ टक्के आहे. सहकारी बॅंकाकडून कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ४.८ टक्के आहे. आदिवासी पत सोसायट्याकडून कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण २७.१ टक्के आहे तर नातेवाईकाकडून कर्ज घेणाऱ्याचे शेतकऱ्यांचे प्रमाण १२.२ टक्के आहे.

१७) नमुना निवडीतील आदिवासी शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाचे अल्प, मध्यम, दीर्घ कालीन प्रकारांनुसार वर्गीकरणात राष्ट्रीयकृत बॅंकाकडून मध्यम व दिर्घकालीन कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ८.६ टक्के आहे तर सहकारी बॅंका कडून कर्ज, मध्यम व दीर्घकालीन स्वरूपाचे घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ४.८ टक्क आहे तर आदिवासी विकास सोसायट्यांकडून अल्पकालीन कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण २७.१ टक्के आहे. नातेवाईक व इतरांकडून कराराच्या आधारावर कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण १२.३ टक्के आहे.

१८) नमुना निवडीतील आदिवासी शेतकऱ्यांच्या पशुधनाच्या माहितीच्या वर्गीकरणानुसार जिल्ह्यात बैल असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण १४.६ टक्के आहे. गाय असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ६.७ टक्के आहे. म्हैशी असणाऱ्या शेतकरी कुटुंबाचे प्रमाण १४.४ टक्के आहे. शेळया असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण २१.४ टक्के आहे तर कोंबडया असणाऱ्या शेतकरी कुटुंबाचे प्रमाण २९.२ टक्के आहे.

**ब) आदिवासी विकास योजनेवरील निष्कर्ष**

१) नंदुरबार जिल्ह्यात आदिवासी विकास योजनांची माहिती ज्या अधिकाऱ्याकडून मिळते त्यामध्ये तलाठी या अधिकाऱ्याकडून सर्वात जास्त शेतकरी कुटुंबाना माहिती मिळते त्यांचे प्रमाण १८५ असून शेकडा प्रमाण ३२.८० टक्के आहे. तर ग्रामसेवक या अधिकाऱ्यापासून माहिती मिळणाऱ्यांचे प्रमाण १४८ असून त्याचे शेकडा प्रमाण २६.२४ टक्के आहे व कृषी अधिकारी यांच्या पासून माहिती मिळणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण २६.५९ टक्के आहे. यावरून हे स्पष्ट होते की, ग्रामीण शेतकऱ्यांचा जास्त संबंध हा तलाठी, ग्रामसेवक व कृषी अधिकारी यांचाही येतो.

२) सध्याच्या युगात प्रसार माध्यमे महत्त्वाची भूमिका बजावीत आहे. प्रसार माध्यमाद्वारे शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात वेगवेगळया योजनांची माहिती होत आहे. नंदुरबार जिल्ह्यात नमुना निवडीतील शेतकऱ्यांना प्रसार

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – II August 2015

माध्यमांद्वारे माहिती मिळणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण १५२ असून त्यांचे शेकडा प्रमाण २६.९५ टक्के आहे.

३) नंदुरबार जिल्ह्यातील नमुना निवडीतील आदिवासी शेतकऱ्यांना विविध योजनांच्या लाभापैकी सर्वात जास्त जमीन सुधारणा या योजनेचा लाभ शेतकऱ्यांना जास्त झालेला आहे. त्याचे प्रमाण १०५ असून त्यांचे शेकडा प्रमाण १८.६१ टक्के आहे. तर दुसऱ्या क्रमांकावर सुधारीत अवजारे व आयुधे मिळणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ९७ असून त्याचे शेकडा प्रमाण १७.१९ टक्के आहे व तिसऱ्या क्रमांकावर निविष्ठा पुरवठा योजनेचा लाभ ८८ शेतकऱ्यांना झाला असून त्यांचे शेकडा प्रमाण १५.६० टक्के शेतकऱ्यांना झालेला आहे. व चौथ्या क्रमांकावर नवीन विहिर (रोजगार हमी योजना) या योजनेचे लाभार्थी ६७ असून त्यांचे शेकडा प्रमाण ११.८७ टक्के आहे. जिल्ह्यात नमुना निवडीतील एकूण शेतकऱ्यापैकी या चार योजनाचा लाभ जास्त झाला आहे.

४) जिल्ह्यातील विविध योजनांतर्गत नियम व्ययाचा आढावा घेतल्यास (सन २०१० – ११, २०११ – १२ व २०१२ – १३ या तीन वर्षाचा) सर्वात जास्त खर्च आदिवासी उपयोजनावर झालेला दिसून येतो. हा खर्च तीन वर्षात ३२३९१.७६ लाख रूपये एवढा आहे.

५) शासकीय योजनांमुळे नंदुरबार जिल्ह्यात आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होत आहे अशा शेतकऱ्यांचे प्रमाण नमुना निवडीतील शेतकऱ्यापैकी ३२९ एवढे आहे व त्याचे शेकडा प्रमाण ५८.३ टक्के आहे.

६) आदिवासी विकास महामंडळाचे नमुना निवडीतील शेतकऱ्यांपैकी ३९० शेतकरी सभासद आहे व त्याचे शेकडा प्रमाण ६९.१ टक्के आहे हे.

७) आदिवासी विकास महामंडळापैकी नमुना निवडीतील शेतकऱ्यांपैकी कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण १५३ असून त्यांचे शेकडा प्रमाण २७.१ टक्के आहे.

८) एकूण कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांपैकी नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण १२४ असून त्यांचे एकूण कर्ज घेतलेल्यांपैकी शेकडा प्रमाण ८१.०० टक्के आहे.

९) नंदुरबार जिल्ह्याच्या निर्मितीनंतर शासकीय योजना मोठया प्रमाणावर राबविल्या जातात हे सांगणाऱ्या एकूण शेतकऱ्यांपैकी ३४२ शेतकऱ्यांनी म्हटले आहे त्यांचे शेकडा प्रमाण ६०.६ टक्के आहे.

१०) जिल्ह्यात शासकीय योजनाच्या लाभातून शिक्षण घेणाऱ्या मुलाच्या प्रमाणात वाढ झाली आहे असे उत्तर देणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ३६३ असून त्यांचे शेकडा प्रमाण ६४.७ टक्के आहे.

११) नंदुरबार जिल्ह्यातील नमुना निवडीतील शेतकरी कुटुंबापैकी ३०४ कुटुंबे दारिद्रयरेषेखाली आहे व त्याचे

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – IV, Issue – II August 2015

शेकडा प्रमाण ५३.९ टक्के आहे.

१२) पिक कसण्याच्या संदर्भात कृषी अधिकाऱ्यामार्फत मार्गदर्शन करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण १५० असून त्याचे शेकडा प्रमाण २६.६ टक्के आहे.

१३) गेल्या काही वर्षात नंदुरबार जिल्ह्यात पिक रचनेत बदल होत आहे हे स्पष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ४७१ असून त्याचे शेकडा प्रमाण ८३.५ टक्के आहे.

१४) नंदुरबार जिल्ह्यातील नमुना निवडीतील शेतकरी झोपडी या प्रकारात राहणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण २७८ असून त्याचे शेकडा प्रमाण ४९.३ टक्के आहे.

१५) शासनाच्या बेघर योजनेतील किंवा दारिद्रय रेषेखालील आदिवासी जमातीतील लोकांना शासकीय योजनेतून घरे मिळणाऱ्या नमुना निवडीतील शेतकऱ्यांपैकी ७९ शेतकऱ्यांनी ही घरे मिळालेली आहेत व त्यांचे शेकडा प्रमाण १४ टक्के आहे.

१६) आधुनिक पध्दतीने शेती कसण्यासाठी सध्या ट्रॅक्टर हे साधन महत्त्वाचे आहे. नंदुरबार जिल्ह्यातील नमुना निवडीतील शेतकऱ्यांपैकी फक्त ५२ शेतकऱ्यांकडे ट्रॅक्टर दिसून आला व त्याचे शेकडा प्रमाण ९.२ टक्के आहे.

**क) धार्मिक व सांस्कृतिक जीवन**

१) नंदुरबार जिल्ह्यात खिस्ती धर्माचे धर्मांतरण करणाऱ्या नमुना निवडीतील शेतकऱ्यांपैकी ७२ शेतकरी कुटुंबाने धर्मांतर केले आहे. त्याचे शेकडा प्रमाण १२.८ टक्के आहे.

२) आदिवासी शेतकरी आदिवासी पध्दतीनेही व हिंदु पध्दतीने सण उत्सव साजरे करतात. व त्याचे प्रमाण ४९२ असून त्याचे शेकडा प्रमाण ८७.२० टक्के आहे.

**शिफारशी**

''नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांचे आर्थिक व सामाजिक अध्ययन सन १९९८ ते २०११'' या विषयावर संशोधन करताना आदिवासी शेतकरी आजही इतर समाजाच्या तुलनेने आर्थिक व सामाजिक दृष्टिकोनातून मागासलेला का आहे? तसेच शासन या समाजासाठी व आदिवासी शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवित असूनही या योजनांचा या समाजाला लाभ का होत नाही? तसेच त्यांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत सुधारणा का होत नाही? यावर संशोधकाने काही उपाय किंवा शिफारशी सुचविलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे

१) शासनाने आदिवासी शेतकऱ्यांचे शेतजमीनीचे सपाटीकरण करून दिल्यास शेतकरी अधिक चांगले शेती करून भरपुर उत्पन्न मिळवल्यास त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल.

२) शासनाने जिल्हयाअंतर्गत जलसिंचनाच्या सुविधा वाढविल्यास आदिवासी शेतकऱ्यांना बारामाही पाणी मिळून त्यांच्या शेतीतील उत्पन्नात वाढ होऊन त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल.

३) जिल्हयांत शेतकऱ्यांना शेतीपुरक व्यवसाय प्रशिक्षण व अनुदान देऊन शेतीपुरक व्यवसायांना उत्तेजन द्यावे.

४) आदिवासी भागात पायाभूत सुविधांमध्ये उदा. रस्ते, वीज, दळणवळण, संपर्कसाधने, सिंचनसेवा, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा इ. वाढ करावी.

५) आदिवासी विकास योजनांची कार्यवाही प्रत्यक्ष लाभांर्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी ठोस उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे.

६) जिल्हयांत निरक्षरता, अंधश्रध्दा, अनिष्ठ रूढी परंपरा मोठया प्रमाणावर आहेत त्यासाठी शिक्षणाचा प्रसार व जनजागृती होणे अत्यंत गरजेचे आहे.

७) जिल्हयांत व्यासनाधिनतेचे प्रमाणही मोठया प्रमाणावर आहे तेही जनजागृतीद्वारे कमी होणे गरजेचे आहे.

८) शासनाने शेतीविकासाबरोबर रोजगार निर्माण करणाऱ्या विकासयोजना राबविणे आवश्यक आहे.

९) आदिवासी समाजामध्ये आरोग्याच्या समस्या मोठया प्रमाणावर असल्याने उदा. कुपोषण, सिकल सेल, डेंग्यु, चिकनगुन्या, या रोगांचा प्रभाव मोठया प्रमाणावर आहे. यासाठी आरोग्य विषयक कार्यक्रम/कार्यशाळा व मोफत आरोग्यविषयक शिबिरांचे आयोजन करावे.

**समारोप**

वरीलप्रमाणे आदिवासींच्या शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी प्रस्तुत अभ्यासकाने वरीलप्रमाणे काही शिफारशी सुचविल्या आहेत. शासन स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ते आजपर्यंत शेकडो योजना राबवित आहेत. तरीही आदिवासी समाजाच्या विकासाची गती मंदच आहे. शासन, सामाजिक कार्यकर्ते, सेवाभावी संस्था इ. नी आदिवासींच्या विकासासाठी अथक प्रयत्न केल्यास आदिवासी समाजाचा नक्कीच विकास होईल यात शंका नाही.

**संदर्भ –**

१) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन. (२०११–१२)

२) वार्षिक आदिवासी उपयोजना अहवाल (२००० ते २०१०) महाराष्ट्र शासन, अदिवासी विकास योजना

३) हाकारा त्रैमासिक जुलै – डिसें. २००५, जाने. – जुलै २००७.

४) डॉ.गोविंद गारे 'महाराष्ट्रातील अदिवासी जमात' – अनिरुध्द अनंत कुलकर्णी, कॉन्टिनेंटल प्रकाशन, विजनगर पुणे. २००२

संकेतस्थळ – १) www.nandurbar.nic.in

२) www.mahatribal.com